जा.क्र-८८/१८
माहिती कक्ष भंडारा
दि. ०८/०३/१८

# वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाचे पृष्ठ

## *- पोलीस शिपाई भरती २०१८ -*

पोलीस अधीक्षक भंडारा यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व www.bhandrapolice.org या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या तरतुदीनुसार लागू करण्यात आलेल्या आहेत.
- उमेदवारास पोलीस अधीक्षक भंडारा यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. अर्ज भरलेल्या दोन घटकांतील परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही. त्यामध्ये बदल करता येणार नाही. एकाच घटकातील एकाच पदासाठी दोन अर्ज करण्यांस मुभा नाही. असे आढळल्यास सबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करण्यांत येईल.
- वरील पोलीस शिपाई पदांसाठी मैदानी चाचणी व लेखी परीक्षा **पोलीस मुख्यालय, भंडारा चे मैदानावर** घेण्यांत येईल. त्यामध्ये बदल झाल्यास त्याबाबत उमेदवारांना कळविण्यात येईल.
- टप्याटप्याने प्राप्त झालेल्या आवेदन अर्जांवर प्रक्रिया करुन शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. म्हणून उमेदवारांनी सुरुवातीपासूनच अर्ज भरावेत.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची शारीरीक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारीरीक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- भरती प्रक्रीयेमध्ये प्रथम शारिरीक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या एकुण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड सुची तयार करण्यांत येईल. तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यांत येतील. कागदत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुची मध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये
- पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होण्या-या अंतीम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून रीक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्यांचा अधिकार आहे.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या / पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**(विनीता साहू)**
**पोलीस अधीक्षक, भंडारा.**